आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

२८ जुलै २०२४ - रविवार

**ठळक बातम्या**

- येत्या १५ ऑगस्ट निमित्त हर घर तिरंगा अभियानात सहभागी होण्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं मन की बातमधून देशवासियांना आवाहन
- व्याघ्र संवर्धनासाठी ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पातल्या गोंड आणि माना जमातींच्या भूमिकेची प्रशंसा
- गडचिरोली जिल्ह्यात जोरदार पावसामुळे जनजीवन विस्कळीत, चाळीस मार्गांवरची वाहतूक ठप्प
- महिलांच्या आशिया चषक टी-ट्वेटी क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम सामन्यात भारत पराभूत, ८ गडी राखून मात करत श्रीलंकेनं पटकावलं विजेतपद

  **आणि**

- पॅरिस ऑलिम्पिकमध्ये महिलांच्या १० मीटर एअर पिस्टल प्रकारात कांस्यपदक जिंकत मनू भाकरनं केला भारताच्या पदक कमाईचा प्रारंभ

**<><><><><>**

येत्या १५ ऑगस्ट निमित्त हर घर तिरंगा अभियानात सहभागी होत संकेतस्थळावर तिरंग्यासोबतचा फोटो अपलोड करावा, असं आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना केलं आहे. प्रधानमंत्र्यांनी आज आकाशवाणीवर मन की बात या कार्यक्रमातून देशवासीयांशी संवाद साधला. हा या कार्यक्रमाचा एकशे बारावा भाग होता. हर घर तिरंगा हे अभियान तिरंग्याचा गौरव करणारा उत्सवच झाला असल्याचं ते म्हणाले.

*****होल्ड - प्रधानमंत्री - हर घर तिरंगा ******

स्वातंत्र्य दिनानिमित्त होणाऱ्या भाषणासाठी दरवर्षीप्रमाणेच यंदाही नागरिकांनी MyGov किंवा NaMo App वर सूचना पाठवण्याचं आवाहनही त्यांनी केलं. यांपैकी जास्तीत जास्त सूचनांचा आपण स्वातंत्र्य दिनाच्या भाषणात समावेश करू असं ते म्हणाले.

उद्या जगभरात साजरा होत असलेल्या व्याघ्र दिनानिमित्त मोदी यांनी वाघ आणि मानवी संघर्ष संपुष्टात आणण्यासाठी, तसंच वाघांच्या संरक्षणासाठी देशभरात सुरू असलेल्या प्रयत्नांची माहिती आजच्या मन की बात मधून दिली. याचं उदाहरण म्हणून त्यांनी राज्यातल्या  ताडोबा - अंधारी व्याघ्र प्रकल्पाचाही उल्लेख केला. तिथं राहत असलेल्या गोंड आणि माना जमातींच्या नागरिकांनी वाघांच्या हालचाली वाढव्यात म्हणून जंगलावरचं आपलं अवलंबित्व कमी करत, इको - टूरिझमच्या दिशेनं पावलं टाकली आहेत असं ते म्हणाले. या प्रयत्नांमध्ये लोकसहभाग मिळाल्यानं देशातल्या वाघांची संख्या दरवर्षी वाढत आहे असं सांगून, जगभरातल्या एकूण वाघांपैकी ७० टक्के वाघ आपल्या देशात असल्याचा अभिमान वाटतो असं ते म्हणाले.

यावेळी प्रधानमंत्र्यांनी हातमाग आणि इतर स्थानिक उत्पादनं लोकप्रिय करण्यासाठी देशभरातल्या महिलांच्या प्रयत्नांची माहिती दिली. यात त्यांनी महाराष्ट्राची पैठणी तसंच विदर्भातली हँड ब्लॉक प्रिंट या हातमाग उत्पादनांचाही उल्लेख केला.

नुकत्याच झालेल्या आंतरराष्ट्रीय गणितीय ऑलिम्पियाड स्पर्धेत आजवरची सर्वोत्तम कामगिरी केलेल्या भारतीय विद्यार्थ्यांच्या चमूची कामगिरी त्यांनी देशवासीयांसमोर मांडली. यावेळी प्रधानमंत्र्यांनी या स्पर्धेतले पदक विजेते पुण्याचे आदित्य वेंकट गणेश आणि सिद्धार्थ चोप्रा, दिल्लीचा अर्जुन गुप्ता, ग्रेटर नॉयडा

इथला कणव तलवार, मुंबईचा ऋषील माथुर आणि गुवाहाटीचा आनंदो भादुरी यांच्याशी संवादही साधला.

सध्या ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धा सुरू आहे, ही स्पर्धा म्हणजे खेळाडूंना जागतिक पातळीवर तिरंगा फडकवण्याची संधी आहे असं म्हणत, या स्पर्धेत सहभागी झालेल्या भारतीय खेळाडूंना देशवासीयांनी पाठिंबा द्यावा असं आवाहनही त्यांनी केलं.

अंमली पदार्थांविरोधातल्या लढ्यातलं मोठं पाऊल टाकत केंद्र सरकारनं ‘मानस’ हे विशेष केंद्र सुरू केलं आहे. याअंतर्गत समुपदेशन आणि पुनर्वसनाबद्दलच्या माहितीसाठी १-९-३-३ हा टोल फ्री मदत क्रमांकही सुरू केला आहे, अशी माहिती प्रधानमंत्र्यांनी दिली.

यंदा खादी ग्रामोद्योगाची उलाढाल पहिल्यांदाच दीड लाख कोटी रुपयांच्या पुढे गेली असून, खादी उत्पादनांच्या विक्रीत ४०० टक्क्याची वाढ झाली असल्याची माहितीही त्यांनी दिली.

प्रधानमंत्र्यांनी यावेळी आसाममधल्या ‘चराईदेऊ मैदाम’ या ठिकाणाचा युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळांमध्ये समावेश झाल्याचं सांगून, नागरिकांनी भविष्यात या ठिकाणांना भेट द्यावी, असं आवाहन केलं.

**<><><><><>**

प्रशासनाने स्वयंसेवी संस्थांच्या सहकार्याने रस्ते सुरक्षा संदर्भात जागृती करावी असं आवाहन केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी केलं. नागपूर इथं जिल्हा रस्ते सुरक्षा बैठकीत ते बोलत होते. प्रशासन, वाहतूक यंत्रणा आणि सर्व रस्ते बांधणी संस्थांनी समन्वय साधून अपघातप्रवण स्थळांची सुधारणा करावी असंही गडकरी म्हणाले. या बैठकीत रस्ते सुरक्षा क्षेत्रात कार्य करणाऱ्या सेव्ह लाईफ या स्वयंसेवी संस्थेने नागपूरमध्ये झालेल्या अपघातांची

तसंच त्यावरल्या उपयांची माहिती सादरीकरणाद्वारे दिली. या बैठकीला जिल्हा रस्ते सुरक्षा समितीचे अध्यक्ष जिल्हाधिकारी विपीन ईटनकर, पोलीस आयुक्त रवींद्र सिंगल, महापालिकेचे आयुक्त अभिजीत चौधरी उपस्थित होते.

**<><><><><>**

२०२४चा केंद्रीय अर्थसंकल्प सर्वसमावेशक आणि देशासाठी अमृत पिढी घडवणारा असल्याचं प्रतिपादन केंद्रीय वाणिज्य आणि उद्योगमंत्री पियुष गोयल यांनी केलं आहे. या अर्थसंकल्पाचा फायदा देशाच्या १४० कोटी जनतेला मिळणार असल्याचा पुनरुच्चार त्यांनी मुंबईत एका कार्यक्रमात बोलताना केला. या अर्थसंकल्पात फक्त गरिबांचं नाही, तर शेतकरी, युवा आणि महिलांचंही हित साधलं जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**<><><><><>**

विधानपरिषदेच्या नुकत्याच झालेल्या निवडणुकीत निवडून आलेल्या सदस्यांचा शपथविधी आज विधानभवनातल्या मध्यवर्ती सभागृहात झाला. विधानपरिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी नवनिर्वाचित सदस्यांना शपथ दिली. पंकजा मुंडे, सदाभाऊ खोत, परिणय फुके, योगेश टिळेकर, अमित गोरखे, भावना गवळी, कृपाल तुमाने, प्रज्ञा सातव, राजेश विटेकर, शिवाजीराव गर्जे, आणि मिलिंद नार्वेकर या सदस्यांनी शपथ घेतली.

**<><><><><>**

**गडचिरोली** जिल्ह्यात जोरदार पावसामुळे आज जनजीवन विस्कळीत झालं. पुरामुळे गडचिरोली-चार्मोशी आणि आलापल्ली-भामरागड या मार्गांसह जिल्ह्यातल्या चाळीस मार्गांवरची वाहतूक ठप्प झाली. धानोरा तालुक्यात गेल्या चोवीस तासांत सर्वाधिक १५४ पूर्णांक २ दशांश मिलिमीटर पावसांची नोंद झाली. गडचिरोली जिल्ह्यात आतापर्यंत १६२ पूर्णांक ९ दशांश टक्के पाऊस झाल्याचं

वेधशाळेनं कळवलं आहे. **हेमलकसा - भामरागड** दरम्यान आलेल्या पुरात अडकलेल्या ३५ नागरिक आणि तीन मुलांना काल एसडीआरएफ आणि महसूल विभागाच्या पथकानं सुखरूप बाहेर काढलं. तसंच गडचिरोली जिल्ह्यातल्या रानमूल इथंही दोन व्यक्तींचे प्राण वाचवण्यात यश आलं. **दरम्यान गोसेखुर्द** धरणातून आज अडीच लाख **क्युमेक्स** इतका विसर्ग करण्यात आला. त्यामुळे गडचिरोली-नागपूर मार्ग बंद होण्याची शक्यता असल्याचं सांगण्यात आलं.

**भंडारा** जिल्ह्यात काल रात्रीपासून पडणाऱ्या मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. वैनगंगा नदी दुथडी भरून वाहत असून गोसेखुर्द धरणाचे २७ दरवाजे उघडले आहेत. लाखनी तालुक्यात अनेकांच्या घरात पावसाचं पाणी शिरून जनजीवन विस्कळीत झालं आहे.

**नांदेड** इथल्या विष्णुपूरी प्रकल्पाचा १ दरवाजा उघडला असून प्रकल्पातून १५ हजार २९७ क्युसेक्स पाणी गोदावरी नदीत सोडण्यात आलं आहे.

**<><><><><>**

महिलांच्या आशिया चषक टी-ट्वेटी क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम सामन्यात भारताला पराभव पत्करावा लागला. श्रीलंकेनं विजेतेपद पटकावलं. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना भारतानं निर्धारित २० षटकात ६ गडी गमावून १६५ धावा केल्या. स्मृती मंधानानं सर्वाधिक ६० धावा केल्या. रिचा घोषनं १४ चेंडूत ३०, तर जेनिमा रॉड्रिग्जनं १६ चेंडूत २९ धावांचं योगदान दिलं.

भारताची गोलंदाजी मात्र निष्प्रभ ठरली. दिप्ती शर्मानं ४ षटकं टाकताना ३० धावा देत एक बळी मिळवला. तिच्या व्यतिरिक्त भारताच्या इतर कोणत्याही गोलंदाजाला बळी मिळवता आला नाही. श्रीलंकेतर्फे हर्षिता समरविक्रमानं नाबाद ६९, तर कर्णधार चमारी अटापट्टूनं ६१ धावा केल्या. कविशा दिलहारीनं नाबाद ३० धावांचं योगदान दिलं. त्यामुळे सामन्यातले ८ चेंडू बाकी असतानाच श्रीलंकेनं

अवघ्या दोन गड्यांच्या मोबदल्यात १६७ धावा केल्या आणि हा सामना ८ गडी राखून जिंकला.

**<><><><><>**

पॅरिस ऑलिम्पिकमध्ये भारताची नेमबाज मनू भाकर हिनं आज इतिहास घडवला. महिलांच्या १० मीटर एअर पिस्टल प्रकारात तिनं २२१ पूर्णांक ७ दशांश गुणांसह कांस्यपदकावर नाव कोरलं आणि या स्पर्धेतलं पहिलंवहिलं पदक भारताला मिळवून दिलं. १२ वर्षांनी भारताला नेमबाजीत पदक मिळालं आहे.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह इतर मान्यवरांनी या यशाबद्दल मनू भाकरचं अभिनंदन केलं आहे. तिनं मिळवलेलं हे यश अनेक क्रीडापटूंना, विशेषतः महिलांना प्रेरणा देईल, असे गौरवोद्गार राष्ट्रपतींनी काढले आहेत. तर, नेमबाजीत भारताला पदक मिळवून देणारी ती पहिली महिला ठरली असल्यानं हे यश आणखी खास असल्याचं प्रधानमंत्र्यांनी समाजमाध्यमावरच्या पोस्टमध्ये म्हटलं आहे.

**<><><><><>**

गेल्या चोवीस तासात विदर्भात काही ठिकाणी जोरदार, तर तुरळक ठिकाणी मुसळधार पाऊस पडला. कोकण आणि मध्य महाराष्ट्रात जोरदार पाऊस पडला.

येत्या दोन दिवसात कोकणात बहुतांश ठिकाणी, विदर्भात अनेक ठिकाणी, मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी, तर मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे. या काळात कोकण, विदर्भ आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

**//<><><><><>//**